Annexure IV

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (जल व वायु प्रदूषण) अधिनियमामधील संमतीपत्राबाबत शुल्क आकारणीचे दर निश्चिती..

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र. आस्था (मप्रनि)1096/प्र.क्र.23/96/का-3,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई- 400 032
दिनांक: 2 जानेवारी, 1997

वाचा: शासन निर्णय क्र. इएनव्ही-1088/672/सीआर-185/का-3,
दिनांक: 18 मार्च, 1992

<u>शासन निर्णय:</u> पर्यावरण विभागाच्या उपरोल्लिखित शासन निर्णयाद्वारे जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम व हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण ) अधिनियम अंतर्गत उद्योग उभारण्यासाठी वा सुरु करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्रासाठी आकारण्यात यावयाचे शुल्काचे दर ठरविण्यात आलेले आहेत. त्याचद्वारे 10 कोटीच्या वरील गुंतवणूक असलेल्या सर्व उद्योगांना रु. 20,000/- इतके शुल्क आकारण्यात येते. अलिकडील शासनाच्या उद्योगांच्या बाबतच्या प्रोत्साहनात्मक धोरणामुळे 10 कोटीपेक्षा जास्त भांडवली गुंतवणूकीचे उद्योग मोठ्या प्रमाणावर उभारले जात आहेत. अशा मोठ्या भांडवली गुंतवणूकीच्या उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची मंजूरी देण्यापूर्वी मंडळाकडून त्यातील प्रक्रिया, कच्चा माल, प्रदूषण नियंत्रण प्रक्रिया इत्यादीची ब-याच कालावधीसाठी वारंवार तपासणी करावी लागते. या कामगिरीसाठी जादा शुल्क आकारणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी मंडळाने 10 कोटीवरील गुंतवणूक करणा-या उद्योजकांना सध्याच्या शुल्कात वाढ करावयाचे प्रस्तावित केले आहे. ही वाढ उद्योगांकडील तपासणी कार्यातील खर्चाचा विचार करुन होणारा खर्च भरुन निघेल अशात-हेने ठरविण्यात आली आहे.

2. यावर विचार करुन, शासनाने खाली दर्शविल्याप्रमाणे शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. ही शुल्क आकारणी जल व हवा अधिनियमानुसार एकत्रित आहे:-

| गुंतवणूक रक्कम | उद्योग उभारण्यासाठी | उद्योग सुरु करण्यासाठी |
|---|---|---|
| 100 कोटीच्या वर | 1,00,000/- | 1,00,000/- |
| 50 कोटी ते 100 कोटी | 60,000/- | 60,000/- |
| 10 कोटी ते 50 कोटी | 40,000/- | 40,000/- |
| 5 कोटी ते 10 कोटी | 10,000/- | 10,000/- |
| 1 कोटी ते 5 कोटी | 5,000/- | 5,000/- |
| 60 लाख ते 1 कोटी | 2,000/- | 2,000/- |
| 10 लाख ते 60 लाख | 1,000/- | 1,000/- |
| 10 लाखापेक्षा कमी | 200/- | 200/- |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

सही/-
( रो. श. कर्णिक )
उप-सचिव, महाराष्ट्र शासन

सत्यप्रत
( रा. गो. पेठे ).
जल प्रदूषण निवारण अभियंता